-

MHAH190016642022

<u>क्रिमीनल चौकशी अर्ज क्र. २९०/२०२२ मध्ये नि.१ वर आदेश</u>
(कृष्णा कैलास धोत्रे विरुध्द ग्रामपंचायत लाडजळगाव ता.शेवगाव)

१. अर्जदाराने महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० चे कलम ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद होण्यासाठी अर्ज केला आहे.

अर्जदाराची केस थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. अर्जदार हे लाडजळगाव, ता. शेवगाव जि. अहमदनगर येथील रहिवासी आहे. अर्जदाराचा जन्म दि. २९/०६/२००३ रोजी लाडजळगाव येथे अर्जदाराचे राहते घरी झालेला आहे. नजरचूकीने त्याचे जन्माची नोंद करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार याच्याकडे जन्माचा दाखला नसल्यामुळे त्याला वेगवेगळया अडचणींना समोर जावे लागत आहे. अर्जदार यांनी ग्रामपंचायत लाडजळगाव, ता. शेवगाव यांच्याकडे जन्माच्या प्रमाणपत्राची मागणी केली असता संबंधितांनी सन २००३ चे जन्म नोंदणी रजिस्टरला जन्माची कोणत्याही स्वरुपाची नोंद आढळत नाही असे अर्जदारास सांगितले की, सदर जन्माची नोंद ही मुदतीत केली नसल्याने मे. कोर्टाच्या आदेशाशिवाय जन्म रजिस्टरला जन्माची नोंद करता येणार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी वरील जन्माची नोंद होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने त्याचे अर्जाचे पुष्टयर्थ नि.३ सोबत ग्रामपंचायत अधिकारी लाडजळगाव, ता. शेवगाव यांच्याकडील दि. ३०/९/२०२२ च्या दाखल्याची मूळ प्रत, नि.०७ वरील दैनिक प्रभात या वृत्तपत्राची मुळ प्रत, सायटेशन नोटीस नि.११, अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र नि.८ वर दाखल केले आहे. तसेच साक्षीदार सुरेश नामदेव धोत्रे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. ९ वर दाखल केले आहे. अर्जदाराने नि.१३ सोबत अर्जदाराचे आधार कार्ड व शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेट दाखल केले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यावर अर्जदाराची

जन्म तारीख दि. २९/६/२००३ अशी नमूद आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणात नि.७ सोबत प्रभात दैनिक वृत्तपत्रात सदर नोंदीबाबत हरकत, आक्षेप मागविण्यात आले. परंतु सदर अर्जास कोणीही व्यक्तीने कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. सबब अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट आहे की, अर्जदाराचा जन्म दि. २९/०६/२००३ रोजी झाला. परंतु त्याच्या जन्माची नोंद सामनेवालाच्या रेकॉर्ड सदरी नाही. सदर बाबीला एक वर्षापेक्षा अधिक काळ झाल्याने तशी नोंद या न्यायालयाच्या आदेशाने करणे गरजेचे आहे. त्यामुळे, जन्म मृत्यू नोंदणी कायदा कलम ९ अन्वये सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. संबंधीत ग्रामपंचायत अधिकारी, लाडजळगाव, ता. शेवगाव यांनी अर्जदाराचा हयांची दिनांक २९/०६/२००३ रोजीच्या जन्माची नोंद योग्य ती फी आकारुन अभिलेखावर करावी.

SANJANA UDAY JAGUSTE Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE Date: 2023.03.29 01:34:37 +0530

ठिकाण – शेवगाव
ता. २८/०३/२०२३

(श्रीमती एस. यू. जागुष्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शेवगाव